ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

# शोधनिबंध - खांदेरी किल्ला

*स्वराली स्वप्नील साईकर,

* स. प्राध्यापक, एस. एन डी. टी. कॉलेज ऑफ आर्टस् अँड एससीबी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स फॉर वूमेन,चर्चगेट.मुंबई

**सारांश**

*आपल्या भारतीय नौदलाची मुहूर्तमेढ श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी रोवली होती. आपल्या भारतीय नौदलाचा झेंडा शिवाजी महाराजांना समर्पित आहे. शिवरायांनी आरामाराचे महत्व ओळखून मराठी आरामाराची स्थापना केली. महत्वाचे किल्ले ताब्यात घेऊन त्यांची डागडुजी केली जसे कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग. तरीही त्यांना खांदेरी किल्ला बांधण्याची गरज वाटली. तर अशा या खांदेरी किल्ल्याचा इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न मी केला आहे, तसेच या शोध निबंधाने पर्यटकांना मार्गदर्शन होईल आणि त्यांना खांदेरी किल्ल्यावर येण्याची प्रेरणा मिळेल आणि पर्यायाने पर्यटन वाढेल.*

**कीवर्ड:** *खांदेरी किल्ला, अलिबागमधील किल्ले, रायगड मधील किल्ले, रायगड मधील पर्यटनस्थळे, अलिबागमधील पर्यटनस्थळ थळ मधील किल्ला.*

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना:**

शिवाजी महाराज जेव्हा कोकणात साम्राज्यविस्तार करत होते तेव्हा अनेक शत्रूंचा नायनाट केला होता. पण त्यांचा सर्वात मोठा शत्रू होता तो म्हणजे जंजिऱ्याचा सिद्दी.जंजिऱ्याच्या सिद्दीशी अनेक वेळा युद्ध करून त्याचा मुलुख मिळवला होता आणि तिथे आपली ठाणी वसवली होती परंतु त्याचा जंजिरा हा किल्ला खूप मजबूत असल्यामुळे आणि सिद्दीकडे कुशल आरमार असल्यामुळे सिद्दीला हरवणे महाराजांसाठी खूपच आव्हानात्मक झाले होते. सिद्दीचे आरमार नेहमी समुद्रात फिरत असून संधी साधेल तेव्हा महाराजांच्या ताब्यातील किनाऱ्यावरच्या गावात वारंवार त्रास देत असे. जमिनीवरून त्याच्या किल्ल्यात रसद सामग्री जाण्याचे बंद करून त्यावर हवे तितके दिवस मारा करीत राहिलो तरी तो जास्त जुमानित नसे. आरमाराच्या साह्याने त्याला दुरच्या बंदरातून लागेल ती सामग्री आणता येत असे त्यामुळे किल्ला हवे तितके दिवस लढण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे होते. जंजिरा आपल्या हातात आल्याशिवाय किनाऱ्यावरील उपद्रव नाहीसा होणार नाही हे शिवाजी महाराजांच्या लक्षात आले होते, तेव्हा सिद्दीचे सगळे बळ कशात आहे तर ते आरमारात आहे तेव्हा त्याच्यासारख आपल्याकडेही आरमार असावे म्हणजे आपल्याला पाण्यातून युद्ध करून जंजिरा हस्तगत करता येईल आणि त्यांचे आरमार आपल्या प्रांतात त्रास द्यायला आला तर आपल्याला हुसकावून लावता येईल. त्याचप्रमाणे हा सिद्दी जो इतका मगरुर झालेला आहे त्याला आरमाराच्या सहाय्याने

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023
OPEN ACCESS
Original Research Article

शह देता येईल. याशिवाय अशा प्रबळ शत्रूंशी आपणास लढावयाचे म्हणजे त्याच्यासाठी आपले आरमार आवश्यक आहे असा विचार करून त्यांनी मराठी आरामाची स्थापना केली. जंजिराच्या सीद्दीच्या मनात महाराजांबद्दल चांगली दहशत बसली.पोर्तुगीज,इंग्रज वगैरे व्यापाऱ्यांना मोठी दहशत वाटून त्यांनी जहाजे समुद्रातून सुरक्षितपणे यावी - जावी यासाठी ते महाराजांस वार्षिक खंडणी देऊ लागले.याप्रमाणे महाराजांची सत्ता पश्चिम समुद्रात हळूहळू बसत चालली आणि सिद्धीचे महत्त्व कमी झाले. कुलाबा, सुवर्णदुर्ग,विजयदुर्ग वगैरे किल्ल्यांची दागडूजी करून ते चांगले मजबूत केले या सर्व ठिकाणच्या आश्रयाने त्यांनी आपल्या आरमार नेहमी जय्यत ठेवले. परंतु एवढे किल्ले ताब्यात असताना सुद्धा जंजिऱ्याच्या सिद्दीवर त्यांना पूर्ण विजय मिळवता येत नव्हता. खूप वेळा जंजिरा किल्ल्यावर त्यांनी वेढा टाकला होता परंतु जंजिराला पराजीत करणे त्यांना खूप आव्हानात्मक वाटत होते. तेव्हा महाराजांनी विचार केला की, एवढं करून आपल्याला यश का मिळत नाहीये तर सिद्दी वाटेल तेव्हा मुंबईच्या प्रांतात दडी मारून राहत असे. मुंबईकर इंग्रज त्याला आश्रय देत असे त्यामुळे आपल्या राज्यात सिद्दी आणि मोगलांची मुंबई बंदराजवळील हालचाल साधेल तेवढी बंद पाडण्यासाठी आणि इंग्रजांनाही धाकात ठेवण्यासाठी काहीतरी केलं पाहिजे असा विचार करून त्यांनी पुढील युक्ती काढली मुंबईपासून बारा मैलाच्या अंतरावर खांदेरी किल्ला बांधला. तेथून त्यांना सिद्दीवर आणि इंग्रजांवर वचक ठेवता आला. अशा रीतीने खांदेरी किल्ल्याचे महत्व मोठे आहे.

**उद्दिष्टे:**

१) खांदेरी किल्ल्याचा इतिहास जाणून घेणे.

२) खादेरी किल्ल्याच महत्व पटवून देणे.

३) खांदेरी किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांना मार्गदर्शन करणे.

४) खांदेरी किल्ल्यावर येण्यासाठी पर्यटकांना प्रेरित करणे.

**खांदेरी किल्ला:**





हा जलदूर्ग मूंबईच्या दक्षिणेस सुमारे १८ कि. मी. अंतरावर, अलिबाग तालूका मुख्यालयाच्या वायव्येस सुमारे ९.५ कि.मी. अंतरावर तर थळच्या पश्चिमेला सुमारे 3 कि.मी. अंतरावर बांधलेला आहे. खांदेरी व उंदेरी हि बेटे एकमेकांपासून अगदी जवळ आहेत. आणि दोन्ही बेटांच्या दरम्यान समुद्राचा प्रवाह आहे. हा सारा परिसर अतिशय खडकाळं असल्यामूळे मोठ मोठी जहाज या बेटांच्या जास्त जवळ जावू शकत नाही. जेव्हा समुद्रात ओहोटी सूरू होते तेव्हा हा भाग एखादया दलदलीच्या मैदानासारखा भासतो.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

**मार्ग:**

मुंबई गेटवेवरून मांडव्याला येण्यासाठी लाॅन्च असतात. गेटवेवरून मांडव्याला येण्यासाठी जवळ जवळ एक तास लागतो. मांडवा जेट्टीला उतरल्यावर अलिबाग येण्यासाठी त्याच लाॅन्चच्याच बस असतात. तर त्यामधुन थळ फाटयावर उतरणे आणि थळला येणे. आणि तेथून पकतीला (लोकल भाषेत थळ जेट्टीला पक्ती म्हणतात) जायचे असे सांगितल्यावर तुम्हांला पक्तीला सोडतील. पक्तीवरून तुम्हांला खांदेरीला जाण्यासाठी बोट मिळेल. खांदेरी किल्याला जाण्यासाठी साधारण अर्ध्या तासाचा वेळ लागतो.

**खांदेरी किल्याची सफर:**



**वेताळ देवाचे मंदिर:**

या देवळाचा १८६७ मध्ये जिर्णोधार केला होता. वेताळदेव मंदीरात प्रवेश केल्यावर आत एका बाजुला असलेल्या त्रिकोणी आकाराच्या वेडयावाकडया प्रस्ताराला शेंदूर लावलेला देव आहे. पण हि देवाची मागची बाजु आहे. त्याचे दर्शन घेण्यासाठी खिडकी वजा झरोक्या जवळ जावे लागते. तेव्हा देवाचे दर्शन होते. या वेताळ देवा बद्दल कोळी लोकांच्या मनात खुप श्रध्दा आहे. कोळी बांधव नवीन बोट तयार केल्यावर वेताळदेवाच्या दर्शनासाठी आणतात. त्यानंतरच त्याचा उपयोग करतात. कोळी बांधवांच्या रिवाजानुसार पावसाळा सुरू झाल्या नंतर नारळी पोर्णिमेला नारळ वाहून मासेमारी करायला सुरवात करतात. श्री वेताळ देवाला नारळ देवून नवस फेडुन त्यांच्या मासळी उदयोगाला सुरवात करतात. होळीच्या दिवशी कोळी बांधव विनामुल्य लोकांना बोटीतुन खांदेरी किल्ल्यावर नेले जाते. सकाळपासुन संध्याकाळपर्यंत या बोटी चालू असतात. अशा प्रकारे कोळी बांधव आपल्या आंनदामध्ये सर्वांना सामावुन घेतात.

**सोंडाला मासा:**

हा सोंडाला मासा आहे. या माशाचा जबडा दातेरी तलवारी सारखा आहे. या तलवारीला वेताळ देवाची तलवार असे मानले जाते. पुर्वी हा मासा मोठया प्रमाणात सापडायचा परंतु २०१३ पासुन हा दिसलेला नाही.

**घंटा:**

हि घंटा १८९१ मध्ये वेताळ मंदिराला भेट दिली होती.

**चमत्कारीक दगड:**

या दगडाची अशी कथा आहे की, एका व्यक्तीने देवळाबाहेरून हा दगड घरी नेला होता तेव्हा तो सामान्य होता परंतु घरी नेल्यावर तो काळा झाला आणि दगडाने वेताळदेवासारखा आकार घेतला आहे. या दगडाला नीट पहिल्यास ते लक्षात येते. आणि त्या व्यक्तीला देवाने स्वप्नात

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

साक्षात्कार दिला अस त्या व्यक्तीच म्हणन आहे.

**शिलालेख:**

मंदिराच्या बाहेरील भिंतीवर हा शिलालेख कोरलेला होता.परंतु यावर कलर केल्यामुळे तो दिसत नाही. त्यामुळे आपल्याला या स्वरूपात पहावा लागतो.

**दिपगृह:**



खांदेरी बेटाच्या आसपासचा परिसर खडकाळ आसल्याने समुद्रातुन संचार करणाऱ्या जहाजांना येथिल खडकाळ भागाची कल्पना यावी, धोक्याची सुचना कळावी या हेतुने बेटावरील दक्षिणे कडील टेकडीवर सुमार 25 मिटर उंचीचे षटकोणी दिपगृह स.न १८६७ मध्ये उभारण्यात आलेले आहे. त्यापुर्वी १८५२ मध्ये या ठिकाणी लहानसा दिप स्तंभ उभारण्यात आला होता. परंतु तो लांबुन कुलाबा किल्ल्याच्या दिपगृहा सारखा भासायचा त्यामुळे अनेकदा अनेकांची फसगत व्हायची व त्यांचा अंदाज चुकून अपघात व्हायचे. हे अपघात टाळण्यासाठी पुढे इग्रजांनी नव्या दिपगृहाची योजना आखली त्यानुसार स्वान, मसग्रोव्ह ॲन्ड इलिसन्स कंपनीने नवीनं दिपगृह बनवला होता.त्याचा उजेड ५० कि.मी. अंतरापर्यंत दिसू शकत होता.त्यानंतर नवीन दिपगृह २००७ ला सोलर वर चालणारा बसवलेला आहे. ह्याचा उजेड १५ ते २० कि. मी. पर्यंत दिसू शकतो.







**कबर:**

ही शुभ्र पांढऱ्या चुन्याने रंगवलेली कबर दाऊद पीर नामक मुसलमान साधूची आहे. दर्यावर्दी लोक आपली सागरी सफर निर्विघ्नपणे पार पडावी यासाठी दोन्हीकडे नवस करतात.

**मेटलिक साउंड स्टोन:**

दाऊद पिराच्या कबरीच्या पलीकडे झाडांच्या सावलीत ही दगडे आहेत. त्यातील फक्त एकच दगडावर छोट्या छोट्या आकाराचेगोलाकार खड्डे पडले आहेत. त्यावर लहान मोठा दगड मारला किं घंटी वाजवल्यासारखा आवाज येतो हा मेटलीक साउंड का येतो? तिथल्या दुसऱ्या दगडांवर का येत नाही? यासारखे अनेक प्रश्नांची उत्तरे आजही अनुत्तरीत आहेत.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

खांदेरी बेटावरील किल्ल्यात एक प्राचीन शिवालय आहे ते कोणी व केव्हा बांधले याचा कुठेही पुरावा नाही या खेरीज श्री गणेश,एकवीरा देवी, श्री हनुमान यांची छोटी छोटी मंदिरे







आहेत आणि गौतम बुद्धाची मूर्ती असलेला एक विहार, ख्रिश्चन लोकांची श्रद्धास्थान असलेला पवित्र क्रॉस देखील येथेच आहे.

**गोड पाण्याचे तळे:**

येथील पाणी पिण्यायोग्य आहे. या गोड पाण्याच्या कोपऱ्यामध्ये सातआसरा देवींचे स्थान आहे. आजही हे पाणी फिल्टर करून पिण्यासाठी वापरतात.

**तोफा:**

खांदेरी किल्ल्यावर एकूण सात तोफा आहेत त्यापैकी चार तोफांनी जमिनीवर लोळण घेतला आहे आणि तीन तोफा दिमाखात गाड्यावर उभी आहेत

**हेलिपॅड:**

खांदेरी किल्ल्यावर हा हेलिपॅड आहे इथे आजही हेलिकॉप्टर उतरवले जातात.

दीपगृहाच्या उंच जागेवरून खांदेरीच्या जलदुर्गाचा आवाका लक्षात येतो. खांदेरीची तटबंदी आजही चांगल्या स्थितीत आहे. सुमारे 16 बुरुज या तटबंधीत बांधलेले असून ते सर्वच सर्व अर्धवर्तुळाकार आहेत. किल्ल्याच्या सर्वोच्च जागेवरून तटबंदीची वैशिष्ट्ये दिसतात. तटबंदित असलेल्या अलंगा किंवा खोल्या, तोफगोळे साठवण्यासाठी बांधलेला पोकळ बुरुज, भग्न वास्तूंचे अवशेष, जोती व्यवस्थित दिसतात कोणत्याही किल्ल्याची तटप्रदक्षिणा करताना मनाला किल्ला संपूर्णपणे पाहण्याच समाधान मिळत असते. खांदेरीची ही तटप्रदक्षिणा पूर्ण करता येते. दोन दगडी चिरांमध्ये सिमेंटिंग मटेरियल म्हणून चून्याचा वापर केलेला नाही. या किल्ल्याची जवळजवळ सर्वच तटबंदी एक दगड एकावर एक रचून बांधलेली आहे. अलिबागचा कुलाबा व थळ येथील खूबलढा किल्ल्याशी या दुर्ग बांधणीचे कमालीचे साधर्म्य आहे. कुलाबा व खांदेरी हे दोन्ही किल्ले शिवकाळात बांधायला सुरुवात केली आणि ते संभाजीराजांच्या सुरुवातीच्या काळात बांधून पूर्ण झाले त्यामुळे या तिन्ही किल्ल्यातील दुर्ग बांधणीचे सारखे पण डोळ्यात भरण्यासारखे आहे.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XII, Issue– VI* *Nov – Dec, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

**खांदेरी किल्ल्याचा इतिहास:**

शिवाजी महाराज जेव्हा कोकणात साम्राज्यविस्तार करत होते तेव्हा अनेक शत्रूंचा नायनाट केला होता. पण त्यांचा सर्वात मोठा शत्रू होता तो म्हणजे जंजिऱ्याचा सिद्दी.जंजिऱ्याच्या सिद्दीशी अनेक वेळा युद्ध करून त्याचा मुलुख मिळवला होता आणि तिथे आपली ठाणी वसवली होती. परंतु त्याचा जंजिरा हा किल्ला खूप मजबूत असल्यामुळे आणि सिद्दीकडे कुशल आरमार असल्यामुळे सिद्दीला हरवणे महाराजांसाठी खूपच आव्हानात्मक झाले होते. सिद्दीचे आरमार नेहमी समुद्रात फिरत असून संधी साधेल तेव्हा महाराजांच्या ताब्यातील किनाऱ्यावरच्या गावात वारंवार त्रास देत असे. जमिनीवरून त्याच्या किल्ल्यात रसद, सामग्री जाण्याचे बंद करून त्यावर हवे तितके दिवस मारा करीत राहिले तरी तो जास्त जुमानित नसे. आरमाराच्या साह्याने त्याला दुरच्या बंदरातून लागेल ती सामग्री आणता येत असे त्यामुळे किल्ला हवे तितके दिवस लढण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे होते. जंजिरा आपल्या हातात आल्याशिवाय किनाऱ्यावरील उपद्रव नाहीसा होणार नाही हे शिवाजी महाराजांच्या लक्षात आले होते, तेव्हा सिद्दीचे सगळे बळ कशात आहे तर ते आरमारात आहे तेव्हा त्याच्यासारख आपल्याकडेही आरमार असावे म्हणजे आपल्याला पाण्यातून युद्ध करून जंजिरा हस्तगत करता येईल आणि त्यांचे आरमार आपल्या प्रांतात त्रास द्यायला आले तर आपल्याला हुसकावून लावता येईल. त्याचप्रमाणे हा सिद्दी जो इतका मगरुर झालेला आहे त्याला आरमाराच्या सहाय्याने शह देता येईल. याशिवाय अशा प्रबळ शत्रूंशी आपणास लढावयाचे म्हणजे त्याच्यासाठी आपले आरमार आवश्यक आहे असा विचार करून त्यांनी मराठी आरामाची स्थापना केली. जंजिराच्या सीद्दीच्या मनात महाराजांबद्दल चांगली दहशत बसली. पोर्तुगीज,इंग्रज वगैरे व्यापाऱ्यांना मोठी दहशत वाटून त्यांनी जहाजे समुद्रातून सुरक्षितपणे यावी -जावी यासाठी ते महाराजांस वार्षिक खंडणी देऊ लागले.याप्रमाणे महाराजांची सत्ता पश्चिम समुद्रात हळूहळू बसत चालली आणि सिद्धीचे महत्त्व कमी झाले. कुलाबा, सुवर्णदुर्ग,विजयदुर्ग वगैरे किल्ल्यांची डागडूजी करून ते चांगले मजबूत केले या सर्व ठिकाणच्या आश्रयाने त्यांनी आपल्या आरमार नेहमी जय्यत ठेवले. परंतु एवढे किल्ले ताब्यात असताना सुद्धा जंजिऱ्याच्या सिद्दीवर त्यांना पूर्ण विजय मिळवता येत नव्हता. खूप वेळा जंजिरा किल्ल्यावर त्यांनी वेढा टाकला होता परंतु जंजिराला पराजीत करणे त्यांना खूप आव्हानात्मक वाटत होते. तेव्हा महाराजांनी विचार केला की, एवढं करून आपल्याला यश का मिळत नाहीये. सिद्दी वाटेल तेव्हा मुंबईच्या प्रांतात दडी मारून राहत असे. मुंबईकर इंग्रज त्याला आश्रय देत असे त्यामुळे आपल्या राज्यात सिद्दी आणि मोगलांची मुंबई बंदराजवळील हालचाल साधेल तेवढी बंद पाडण्यासाठी आणि इंग्रजांनाही धाकात ठेवण्यासाठी काहीतरी केलं पाहिजे असा विचार करून पुढील युक्ती काढली मुंबईपासून बारा मैलाच्या अंतरावर खांदेरी व उंदेरी अशी दोन लहान बेटे आहेत. ही समोरील किनाऱ्यावरून दोन-तीन मैलांच्या अंतरावर आहेत.या बेटावरून मुंबई शहरात जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक जहाजावर नजर ठेवता येऊन शत्रूंची तिकडे हालचाल हवी तेव्हा कळण्याजोगी आहे,असे महाराजांचे लक्षात आले. त्यांनी ती आपल्या ताब्यात घेऊन त्यावर मजबूत किल्ले बांधण्याचे मनात आणले आणि ३०० शिपाई व तितकेच मजुर, शस्त्रे व विखणे मुबलक देऊन प्रथम

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023
OPEN ACCESS Original Research Article

खांदेरी बेटावर पाठवले व तटबंदीचे काम झपाट्याने सुरू केले हे वर्तमान इंग्रजांस कळले तेव्हा ते मोठ्या काळजीत पडले. ह्या बेटांवर महाराजांचे ठाणे झाले असता आपणास किती धोका आहे हे त्यांच्या तेव्हाच लक्षात आले. ते म्हणू लागले की, " ह्या बेटावर आपला हक्क आहे पोर्तुगीजांनी मुंबई बेटा बरोबर ही बेटे आम्हास दिली होती". तिकडे वसईचे पोर्तुगीज ही त्यावर हक्क सांगू लागले ते म्हणाले, " की ह्या बेटावर इंग्रजांचा मुळीच हक्क नाही. ती पुष्कळ वर्षे आमच्या ताब्यात आहेत आम्ही त्यावर वसाहत करणार होतो परंतु त्यावर विहिरी खेळल्या असता त्यात गोडे पाणी सापडले नाही म्हणून तो बेत आम्ही रहित केला".

महाराजांनी त्यांच्या म्हणण्याकडे मुळीच लक्ष पुरवले नाही इंग्रजांनी महाराजांना हरकत करण्याचा निश्चय केला. इंग्रजांनी ३ शिबाडे तयार करून त्यावर ४० युरोपियन नेमले व त्यास असे सांगितले की शिवाजी महाराजांची तारवे खांदेरी जवळ येऊ देऊ नका व बेटावर त्यांची अंमलदार आहेत त्यांना आपले लोक घेऊन निघून जा सांगा ह्याप्रमाणे ही शिबाडे बेटापाशी गेली आणि त्यावरील अंमलदारांनी महाराजांच्या लोकांस तिथून घेऊन जावे सांगितले त्यावर त्यांनी असं जबाब दिला की, " आमच्या धन्याच्या हुकमावरून आम्ही आमची कामगिरी सोडून जाणार नाही". . इंग्रजांनी त्याच बरोबर आणखी एक रिवेंज नावाचे फ्रिगेट देऊन ते पुन्हा खांदरीकडे रवाना केल्या रिवेंजवर 16 तोफा होत्या. हे इंग्रजांचे तारवे पुन्हा खांदेरी जवळ फिरू लागली. मराठ्यांची तारवे रात्रीची झपाट्याने येऊन तटबंदीला लागणारा मालमसाला व लोकांस लागणारे अन्नसामग्री आणून पोहोचवीत आणि तशीच त्वरेने परतत होते.त्यांचा पाठलाग इंग्रजांचा जहाजाने होत नसे त्याचे मुख्य कारण असे होते की, मराठ्यांच्या पडावांच्या वलह्यांची व तारवांची रचना अशी होती की ती वारा किंवा लाटा किती प्रतिकूल असल्या तरी जलद चालत. इंग्रजांचे तारवे तशी जलद चालत नसत शिवाय त्यांचा जमाव फार थोडा असल्यामुळे त्यांचा मराठ्यांवर हल्ला करण्याचे ध्येर्यही होत नसे. म्हणून इंग्रज अंमलदारांनी आपल्या वरिष्ठांपाशी आणखी कुमक मागितली त्यावरून आणखी काही जहाजे भाड्याने घेतली आणि त्यावर लोक नेमून ती खांदेरीकडे रवाना केली. असे सांगतात की, या बेटांपाशी इंग्रजांची एकंदर ८ जहाजे होती एक फ्रिगेट, दोन गुराबा, तीन शिबाडे व दोन मचवे.ह्या जहाजांवर युरोपियन व इतर शिपाई म्हणून एकंदर 200 लोक होती याशिवाय आणखी खलाशी होते.

दौलत खानाच्या हाताखालील आरमार खांदेरीच्या समोरचे चौल जवळ उरवा करून होते इथून प्रत्येक रात्री काही जहाजे तो बेटावर पाठवी आणि शत्रूचा पाठलाग होण्यापूर्वी ते पुन्हा आरमारापाशी येत. एके दिवशी दौलतखानाने आपल्या आरमार तेथून उठवून बेटाकडे चालवले. ते इतक्या त्वरेने चालले की इंग्रजांची तारवे नांगर ओढून घेऊन तयार होण्यापूर्वी ते त्यांच्या जवळून पार निघून गेले. जाता-जाता त्याने इंग्रजांचे एक गुराबा हाती लागला ते पकडून नेले तेव्हा इंग्रजांचे बाकीचे जहाजे तेथून पळत सुटली इकडे रिवेंज मात्र धीर धरून राहिले पण त्यास मराठ्यांच्या आरमाराने चहुंकडून घेरले रिवेंज वर तोफा चांगल्या रचल्या असल्यामुळे त्याच्यावरून होणारा सरबत्ती पुढे महाराजांचा टिकाव लागेना. ह्यावेळीस रिवेंज च्या कॅप्टन ने आणखी एक दगाबाजी केली की आपली शिडे पाडून आपण हतबल होऊन शरण आल्याचा बहाना केला. हा दौलत खाण्यास खरा वाटून तो

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XII, Issue– VI* *Nov – Dec, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

त्याच्याजवळ 24 गुरबानिशी आला आणि इंग्रज जहाजावर आपले लोक पाठवण्या साठी त्याने होड्या पाण्यात लोटल्या. त्याबरोबर त्या कॅप्टनने एकदम सरबत्ती सुरू केली त्यामुळे मराठ्यांचे बरेच नुकसान झाले आणि त्याची पाच जहाजे बुडाली.

ही अशी त्यांची झटापट चालली असता तिकडे बेटावर आणखी काही लोक अन्नसामग्री व माल- मसाला पोहोचून निघून गेले. याप्रमाणे आपले मुख्य कामगिरी पूर्ण झाली असे पाहून दौलत खानाने आपले आरमार नागोठण्याच्या बंदराकडे चालवले. इंग्रजांचे फ्रीगेट काही वेळ त्याच्या मागून गेले पण ते आरमार दूर निघून गेले तेव्हा ते परत आले. याप्रमाणे दौलत खानाने नागोठण्याच्या खाडीत राहून खांदेरीवर लागणारी सामग्री पुरवण्याचा क्रम एकसारखा चालवला होता. त्यांस इंग्रजांच्या जहाजांकडून म्हणण्यासारखं काही प्रतिबंध झाला नाही.

ही अशी खांदेरी जवळ मराठ्यांच्या व इंग्रजांच्या जहाजांची धावपळ चालली असताना महाराजांनी ५००० लोक कल्याणास पाठवले. त्यांनी पूर्वी प्रमाणेच पुन्हा वसईच्या पोर्तुगीजांशी ठाण्यावरून मुंबईकडे जाण्यास परवानगी मागितली ती देईना. हे मराठ्यांचे सैन्य कल्याणकडे आल्याची बातमी मुंबईच्या इंग्रजांस कळतात त्यांना मोठी धास्ती पडली. पोर्तुगीजांनी त्यास आपल्या प्रांतातून येण्यास परवानगी दिली. ह्याप्रमाणे महाराजांनी खांदेरी,उंदेरी वर ठाणे बसवण्याचा उद्योग चालू ठेवला.इंग्रजांकडून त्यास काय एक अटकाव होईना व पोर्तुगीज तर तटस्थ होऊन राहिले होते हे वर्तमान सुरत येथील मोगल सुभेदारास कळले तेव्हा त्यासही मोठी दहशत वाटली. आज पर्यंत शिवाजी महाराजांचे प्राबल्य जमिनीवरच विशेष झाले होते ते आता समुद्रावर स्थापित होऊन आपला दोघांकडून कोंडमारा होण्याचा समय आला असे त्यास वाटू लागले. सुरतेचे महत्व काय ते प्रदेशातील व्यापारामुळे वाढले होते. त्या व्यापारावर महाराजांचा शह बसून सुरत शहर व दुसरी बंदरे लवकरच त्यांच्या हाती जातात असे भय त्याला वाटले. ह्या प्रसंगी सिद्दीसही अशी भीती वाटू लागली की आपला जंजिरा आता महाराजांचा हाती जाऊन आपल्या नाईनाट होईल का काय असे त्याला वाटू लागले. यावेळेला सिद्दी इंग्रजांशी संगनमत करण्याचा प्रयत्न करत होता परंतु इंग्रज त्याला मदत करू करत नव्हते कारण की त्यांना शिवाजी महाराजांचा आरमाराची भीती वाटत होती.

सिद्दीला इंग्रज मदत करत नाही म्हणून त्याने स्वतः बेटावर आपल्या जहाजातुन तोफा सोडण्याचा आरंभ केला आणि बेटावरून ही मराठ्यांनी आपल्या तोफांचा भाडीमार सुरू केला. हा सगळा प्रकार इंग्रज लोक तटस्थ वृत्तीने पाहत राहिले. हे त्यांचे वर्तन पाहून मराठ्यांच्या आरमाराने त्यास उपद्रव देण्याचे सोडून सगळा रोख आपला हाडवैरी जो सिदद्दी आहे त्याच्यावर धरला यावेळी रायगडावर इंग्रजांचा वकील जाऊन तहाचे बोलणे करीत आहे हे सिद्दीला समजले होते ह्या बोलण्यात बिघाड करण्याच्या हेतूने आपली काही जहाजे मुंबईच्या बंदरावर नेऊन महाराजांच्या प्रांतात प्रवेश केला आणि तिकडे चार गाव जाळून,उध्वस्त करून पुष्कळ माणसे पकडून आणली. याप्रमाणे सिद्दीचे व इंग्रजांच्या आरमार खांदेरी बेटापाशी घिरट्या घालत असता त्याची परवा न करता नागोठनाच्या खाडीतून मराठ्यांचे पढाव बेटास येऊन लागत. अन्नपण्याची व दारूगोळ्याचे सामग्री त्यावरील लोक असे एकसारखी पूरवीत.सिद्दी पुन्हा बेटाकडे होऊन तोफांचा

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023
OPEN ACCESS Original Research Article

भाडीमार करू लागला पण मराठ्यांनी त्याला बिलकुल दाद दिली नाही. सिद्दीची गडबड चालली असता मुंबईला १६८० च्या मार्च महिन्यात महाराजांचा व इंग्रजांचा तह झाला त्या तहानुसार, सिद्दीच्या आरमारास इंग्रजांनी आपल्या बंदरात पावसाळ्यात पावसाळ्यात आश्रय देऊ नये आणि दिलाच तर त्यांनी त्याच्याकडून महाराजांच्या मूलखास उपद्रव न करण्याचा करार करून घ्यावा असे ठरले.

या नंतर खांदेरी उंदेरी ही बेट महाराजांच्या ताब्यात आली. एकट्या सिद्दीला मराठ्यांना बेटावरून काढून लावण्याचे सामर्थ्य नव्हते. उंदेरी त्याने आपल्या तोफा चढवल्या होत्या.पण दोन्ही बाजूंकडून होणाऱ्या मराठ्यांचा मारापुढे तेथे त्याचा निभाव न लागून ते बेट आपल्या स्वाधीन ठेवण्याचा विचार त्याला सोडावा लागला. ही आपल्या जवळील दोन्ही बेटे मराठ्यांचे ताब्यात जाऊन त्यावर त्यांची ठाणे बसली.याबद्दल इंग्रजांना मोठे वैशम्य वाटू लागले. ती आपल्या ताब्यात असावी असे त्यांच्या मनात फार होते जास्त मराठ्यांशी लढून ती परत घेण्याविषयी त्यांनी कोर्ट ऑफ डायरेक्टर यांच्याकडे परवानगी मागितली परंतु त्यास मिळाली नाही.त्या कोर्टाचे असे म्हणणे होते की मराठ्यांसारख्या प्रबळ लोकांशी वैमनस्य करून आपणास तिथे थारा नाहीसा करण्यात काही शहाणपणा नाही.

पुढे १८१३ मध्ये बाबुराव आंग्रे याचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा मुलगा मानाजी यांना बाजीराव पेशव्याने आरामार प्रमुख केले. त्यांच्या मदतीबद्दल दि.७ सप्टेंबर १८१४ साली खान्देरीसह १०,००० रुपये महसूलाची २१ गावे पेशव्यांना दिली. तेव्हा खांदेरी बेट पेशव्यांच्या ठाणे विभागात समाविष्ट झाले. इ. स.१८१८च्या मे -जून महिन्यात खांदेरी व उंदेरी ही बेटे इंग्रजांच्या ताब्यात गेली.

**पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक बाबी:**



१) खान्देरीला जाण्यासाठी प्रॉप्रर जेट्टी हवी आहे. कारण बोट मध्ये बसताना खूप अडचणी येतात. जर भरतीमध्ये पाणी पूर्ण भरलं तर उतरण्यासाठी मोठी कसरत करावी लागते.

२) खान्देरीवर येणाऱ्या पर्यटकंसाठी नियम थोडे कडक करण्याची गरज आहे कारण किल्ल्याची पवित्रता बिघडवण्याचं काम हे हौशी पर्यटक करत असतात ठिकठिकाणी कचरा, बियरच्या बाटल्या, जेवणाच्या पत्रावळ्या तीथेच टाकून देतात.

३) काही दिवसांपूर्वी येथे मोठ्या प्रमाणात आग लागली होती. एका पर्यटकाकडून जेवण बनवत असताना चुकून इथे आग लागली होती. जवळच सोलर प्लांटच्या

वायरिंना धोका निर्माण झाला होता त्यामुळे किल्ल्यावर नियम कडक करण्याची गरज आहे.

४) एकेकाळी शत्रूला लोळवणाऱ्या या तोफा स्वतःच लोळत पडल्या आहेत. या ऐतिहासिक वस्तूंची काळजी घेणे गरजेचे आहे.

५)वरील जनरेटर आणल्यापासून उपयोगात आणले नाहीत.त्यामुळे शासनाच नुकसान होत आहे.

**निष्कर्ष:**

खांदेरी किल्ल्याची सध्यस्थिती चांगली आहे. पण शासनाने अजून लक्ष देणे गरजेचे आहे. जेणेकरून पर्यटनात अजून वाढ होईल. किल्ल्यावर नियम थोडे कडक करण्याची गरज आहे. जेणेकरून किल्ल्याचे पावित्र राखण्याचे काम होईल आणि आपल्या इतिहासाची जपणूक होईल आणि येणाऱ्या पिढीला प्रेरणा देत राहील.

**संदर्भग्रंथ:**

१) छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र -कृष्णराव अर्जुन केळूस्कर

२) अलिबाग, थळ, खांदेरी, उंदेरी - महेश तेंडुलकर

३) शिवकालीन पत्रसंग्रह

४) मराठीचा प्रशासकीय सामाजिक व आर्थिक इतिहास - प्रा. बी. एस. सावंत आणि प्रा. जाधव

५) इंटरनेट

Prof. Saikar S.S. (2023). शोधनिबंध - खांदेरी किल्ला. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 93–102). AMIERJ. https://doi.org/10.5281/zenodo.10495559